## प्रकरण पहिले

# मराठी कादंबरी

# प्रकरण पहिले

## मराठी कादंबरी :-

मराठी साहित्यामध्ये गद्य व पद्य असे दोन वाङ्मय प्रकार आढळतात. गद्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक ललितनिबंध यांचा समावेश होतो. तर पद्यामध्ये कविता, खंडकाव्य, भावकाव्य यांचा समावेश होतो. त्यामध्ये कादंबरीलेखन बरेचसे लोकप्रिय आहे. अनेक लेखकांनी कादंबरी हा वाङ्मय प्रकार हाताळला आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर ज्या घडामोडी झाल्या त्याचे चित्रणही आपणास मराठी कादंबरीच्या अंतरंगात पहावयास मिळते. लेखक कादंबरीच्या अनेक पद्धतीचा रचना प्रकारांचा, तंत्रघटकाचा आवश्यकतेनुसार उपयोग करून कादंबरीचा जीवनानुभव प्रभावीपणे व परिणामकारकतेने रेखाटण्याचा प्रयत्न करतो, कादंबरी या वाङ्मय प्रकाराला जीवनाचा आरसा असे संबोधले आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये मानवी जीवन व्यवहाराचे रूप अविष्कृत करण्याची क्षमता असते.

कादंबरी हा एक आधुनिक ललित वाङ्मय प्रकार आहे. हा वाङ्मय प्रकार इंग्रजी राजवटीत जन्माला आला असला तरी एक रचनाप्रकार म्हणून तो हिंदुस्थानात नवा नाही. या संदर्भात डॉ. रविंद्र ठाकूर म्हणतात, ''एकोणिसाव्या शतकातील मराठी कादंबरी इंग्रजी - फार्सीच्या संसर्गप्रभावातून आणि संस्कृतच्या संस्कारापासून आकारास आली.''[१] इ.स. १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या 'महाराष्ट्र भाषेचा कोष' या ग्रंथात कादंबरी या शब्दाचा अर्थ 'कल्पित कथा' असा दिलेला आहे. यावरून असे म्हणता येईल की कल्पित कथेला कादंबरी हे नाव बऱ्याच आधीपासून मराठीत रूढ असावे. समाज जीवनाशी व्यापक नाते असणारा असा हा वाङ्मय प्रकार आहे. या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप विस्तृत व सखोल आहे.

कादंबरी हा साहित्यप्रकार आधुनिक असला तरी त्याचे बीज फार जुने आहे. समाजजीवनाशी व्यापक नाते आहे. कादंबरी सदृश्य गद्य कथात्मक साहित्य महाराष्ट्रात अकराव्या शतकात लीळाचरित्राच्या रूपाने निर्माण झालेले आहे. लीळाचरित्रामध्ये छोट्या

छोट्या कथा गुंफलेल्या असून म्हाइंभटांनी चक्रधरांची जीवनकथा सलग तीन विभागात वर्णन केली आहे. आजच्या कादंबरी वाड्.मय प्रकाराची वैशिष्ट्ये आपणास लीळाचरित्रामध्ये दिसतात.

**कादंबरीचा उदय व विकास -**

"बाणभट्टाची 'कादंबरी' किंवा सुबन्धुची 'वासवदत्ता' यांचा मात्र येथे विशेष उल्लेख केला पाहिजे. कारण आजच्या कादंबरी वाङ्मय प्रकाराचे तंत्र जरी त्यांच्यामध्ये आढळले नाही तरी कादंबरी लेखनाचे पूर्वेकडील पहिले प्रयत्न या दृष्टीने यांचे कादंबरीच्या विकसनात महत्त्वाचे स्थान आहे. प्रणयप्रधान, चित्ताकर्षक कथानक व ललितमधुर भाषाशैली हे यामधील गुण वाखाणण्यासारखे आहेत. यापैकी पहिल्या ग्रंथाचे विशेषनाम हे या प्रकारचे जातिवाचक सामान्यनाम झाले. यातच बाणाच्या कादंबरीचे महत्त्व व्यक्त झाले असून यात या ग्रंथाचा योग्य तोच गौरव झाला असे म्हणावयास हरकत नाही."[२]

हिंदुस्थानातील प्राचीन काळच्या एक दोनच कादंबऱ्या उपलब्ध असून याशिवाय दुसऱ्या काही लिहिल्या गेल्या असल्या तरी त्या काळाच्या उदरात गडप झाल्या आहेत. मध्ययुगीन काळात मुस्लिमांचे राज्य आले. त्यावेळी अरबी व फारशी वाङ्मयाचा व संस्कृतीचा प्रसार हिंदुस्थानात झाला पण त्यामुळे कादंबरी वाङ्मयास फारशी चालना मिळालेली दिसत नाही. हिंदुस्थानात कादंबरी वाङ्मयाचा पुनर्जन्म अगदी अलीकडे म्हणजेच दिडशे-दोनशे वर्षांपूर्वी इंग्रजी अमदानीत झाला. निरनिराळ्या देशी भाषांतील सुरूवातीच्या कादंबरीकारास स्फूर्ती इंग्रजी वाङ्मयाच्या परिचयानेच झाली.

काव्य, नाटक, कथा आणि कादंबरी या चार वाङ्मय प्रकारांनी आपल्या क्षेत्रात अत्युच्च शिखर गाठलेले आहे. पण तरीही असे म्हणावेसे वाटते की कादंबरी या वाङ्मय प्रकारावर "इंग्रजी भाषेने जी लेणी मराठी भाषेवर चढविली त्यापैकी कादंबरी हे एक आकर्षक लेणे होय."[३]

"जीवनाचे तरल क्षण पकडण्यापासून ते विराट समाज जीवनाचे दीर्घकालीन जीवनचित्रण करण्याचे सामर्थ्य कादंबरी वाङ्मय प्रकारात आहे."[४] त्यामुळे ही कादंबरी मानवी मनाची पकड घेवून इ.स. १९२०-१९४७ या काळात विकसित होत होती. नंतरच्या काळात तिने प्रौढ स्वरूप धारण करून आपले एक विशिष्ट स्थान निर्माण केले.

<u>कादंबरीची व्याख्या</u> -

१) पाश्चात्य कादंबरीचा जनक फील्डींग यांच्या मते, "गंभीर वातावरण नसलेले गद्य महाकाव्य म्हणजे कादंबरी होय."[५]

२) मनोविश्लेषणास प्राधान्य देणारे टीकाकार यांच्या कते "हृदयान्तरंगाचे आविष्करण अथवा मानवी ह्दयाचा सूक्ष्म कलात्मक अभयास म्हणजे कादंबरी होय."[६]

३) एच.जी.वेल्स यांच्या मते "ज्यात सर्व काही सामावेल अशी गारूड्याची थैली म्हणजे कादंबरी होय."[७]

४) एम.ॲबेल चेव्हेली या फ्रेंच लेखकाच्या मते "जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा म्हणजे कादंबरी होय."[८]

५) न्यू इंग्लिश डिक्शनरीकार यांच्या मते "भरपूर विस्तार असलेली मानवी जीवनातील व्यक्ती व त्यांच्या कृतीचे कथानकातून दर्शन घडवणारी काल्पनिक गद्य गोष्ट किंवा कथा म्हणजे कादंबरी होय."[९]

६) मा.का.देशपांडे यांच्या मते "कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य चित्र होय."[१०]

७) प्रेमचंद यांच्या मते "मै उपन्यास को मानव चरित्र का चित्र मात्र समझता हूँ। मानव चरित्र पर प्रकाश डालना और उसके रहस्यों को खोलना ही उपन्यासों का मूलतत्व है।"[११]

इंग्रजी शिक्षणाचा अधिकाधिक फैलाव होऊ लागला. ब्रिटीशांचे वर्चस्व असल्यामुळे रोनाल्ड आणि स्कॉट यांच्या इंग्रजी कादंबऱ्या सुशिक्षितांच्या वाचण्यात आल्या यामध्ये ऐतिहासिक व अद्भुत प्रसंगाचे चित्रण फार उत्कृष्ट साधले गेले होते. काळाप्रमाणे माणसे सुशिक्षित होऊ लागली होती. त्यामुळेच ''अद्भुत कादंबऱ्यांकडील ओढा कमी होऊन तिचा कल वास्तविकाकडे झुकू लागला. परंतु हा ओढा एकाएकी कमी होणे शक्य नव्हते. अद्भुताला व वास्तविकाला साधणारा एक दुवा आवश्यक होता. त्यामुळे अद्भुततेला नवीन प्रांत शोधून काढणे आवश्यक होऊन बसले.''[१२]

गंगाधर गाडगीळ यांनी म्हटले आहे की ''कादंबरीची रचना संघराज्यासारखी असते. कादंबरीमध्ये अनेक केंद्रे असतात. वेगवेगळ्या घटकातून रचलेल्या अनुभवांच्या अनेक स्वायत्त संघटना असतात. या संघटना परस्परबद्ध असतात पुष्कळदा तिच्यातील भिन्न कथासूत्रे परस्परांच्या प्रगतीला मदत करतात मात्र असे नेहमीच असते असे नाही. कधी कधी या भिन्न कथासूत्रातील या स्वायत्त अनुभव संघटनांचा परस्परांशी कलात्मक संबंध मात्र निश्चित असतो.''[१३]

जे.बी.प्रिस्टले यांनी ''काल्पनिक पात्रे व घटना यांचा परामर्श घेणारा गद्य कथाप्रकार''[१४] अशी कादंबरीची व्याख्या केली आहे. या व्याख्येत कादंबरीच्या कथात्मकता आणि निवेदनात्मकता या घटकांबरोबरच पात्रे व घटना या महत्त्वाच्या घटकांचाही निर्देश आला आहे. तथापि कादंबरीची सर्वमान्य अशी व्याख्या कोणीही करू शकलेले नाही. कारण बदलत्या काळाप्रमाणे कादंबरीच्या स्वरूपात बदल झालेले दिसून येतात. एक बाब लक्षात घेतली पाहिजे ती अशी की कादंबरीतून चित्रित होते. ते प्रामुख्याने मानवी मन, मानवी जीवन यातील प्रत्यक्षात जगत असलेले जीवन आणि कादंबरीतील जीवन यातील भेद लक्षात घेतला पाहिजे. प्रत्यक्ष जीवनातील अनेकविध घटकांच्या पसाऱ्यातून लेखक काही निवड करीत असतो. कादंबरीत चित्रित होणारे मानवी जीवन प्रत्यक्षातील जीवन नसते हे

खरेच, परंतु ते जीवनासारखे असते. जीवनाशी संवादी असते म्हणूनच चांगल्या कादंबऱ्यातून आपणास जीवनाचा प्रत्यय येत असतो.

कादंबरीला सत्य सृष्टीचा आधार असतो. सामाजिक वास्तव हेच कादंबरीचे आशयद्रव्य असते. व्यक्ती सामाजिक वास्तवात जगत असते. व्यक्ती-व्यक्तींचे परस्पराशी जे संबंध येतात त्यातच सामाजिकता असते. कादंबरीत काही विशिष्ट व्यक्तींचे जीवन चित्रित होत असले तरी शेवटी त्यातून मानवी स्वभावच व्यक्त झालेले असतात. अशा रीतीने तो मानवी मनाचाही शोध ठरतो.

कादंबरीच्या विविध व्याख्यांच्या आधारे कादंबरीची स्वभाववैशिष्ट्ये लक्षात येतात. लेखक कादंबरीच्या अनेक पद्धतींचा, रचना प्रकाराचा, तंत्रघटकांचा आवश्यकतेप्रमाणे उपयोग करून जीवनानुभव प्रभावीपणे व परिणामकारकपणे रेखाटण्याचा प्रयत्न करतो. त्यावरून कादंबरी हा वास्तवाधिष्ठित साहित्यप्रकार आहे असा निष्कर्ष आपणास काढता येतो.

**कादंबरीचे स्वरूप :**

मराठी भाषेतील पहिली कादंबरी भाषांतरीत आहे. इ.स. १८४१ मध्ये हरि केशवजी यांनी जॉन बन्यनच्या 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' या कादंबरीचा 'यात्रिकक्रमण' हा अनुवाद प्रसिद्ध केला. बाबा पद्मनजी यांनी इ.स. १८५७ मध्ये लिहिलेली 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी होय. त्या पाठोपाठ लक्ष्मणशास्त्री हळबे (मुक्तामाला इ.स. १८६१) ना.स.रिसबुड (मुंजुघोषा, इ.स. १८६८) रा.भि.गुंजीकर (मोचनगड, इ.स. १८७१) म.वि.रहाळकर (नारायणराव आणि गोदावरी, इ.स. १८७९) के.ल.जोरवेकर (विचित्रपुरी, इ.स. १८८१) साळुबाई तांबवेकर (चंद्रप्रभा विरहवर्णन, इ.स. १८७३) यातील काही लेखकाच्या कादंबऱ्या या कल्पित गोष्टी व बोधवादी होत्या. 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी मानली जाते. इ.स. १८७४ पासून मराठी साहित्यक्षेत्रात नवे

मन्वंतर अवतरले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधास, केशवसुतांनी कवितेस, आण्णासाहेब किर्लोस्करांनी नाटकास आणि हरिभाऊंनी कादंबरीस नवे रूप व नवा अर्थ दिला. सामाजिक जीवनात निर्माण झालेल्या नव्या जागृतीचे हे सांस्कृतिक फलित होते.

हरिभाऊ आपटे यांची 'मधली स्थिती' (१८८५) ही कादंबरी भाषांतरीत असली तरी त्यांच्या या कादंबरीने मराठीतील सामाजिक कादंबरीला निराळे रूप दिले. व्यक्तींचे, कुटुंबाचे व त्याभोवती असलेल्या सामाजिक परिसराचे पारदर्शी चित्रण या कादंबरीपासून सुरू झाले. इ.स. १८१७ पर्यंत सामाजिक व ऐतिहासिक मिळून हरिभाऊंनी एकूण बावीस कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्यांची प्रेरणा ही सामाजिक होती. डॉ.अंजली सोमण म्हणतात, ''हरिभाऊंच्या काळातले सामाजिक सुधारणेच्या विचाराने भारलेले वातावरण, हरिभाऊंवर पडलेला इंग्रजी सामाजिक कादंबऱ्याचा प्रभाव आणि कथात्म वाङ्मयातून स्वकालीन समाजाची चित्रे रंगवण्याची वास्तववादी प्रेरणा हे तीन घटक एकत्र आल्यामुळे हरिभाऊंच्या कादंबरीच्या रूपाने 'यमुनापर्यटन' नंतर खंडित झालेली सामाजिक कादंबरीची परंपरा मराठीत पुन्हा सुरू झाली.''[१५]

हरिभाऊनंतर वा.म.जोशी यांच्या कादंबरीने एक स्वतंत्र युग निर्माण केले. त्यांनी मराठी कादंबरीला तात्विकतेचे परिमाण दिले. अनेक सामाजिक प्रश्नांना त्यांनी वैचारिकतेची जोड दिली. याच काळात लेखन करणाऱ्या श्री.व्यं.केतकर यांनी आपल्या लेखनातून कादंबरीला सामाजिक वास्तवाचे भान दिले. भा.वि.वरेरकर यांनी आपल्या कादंबरीलेखनातून स्त्रियांचे प्रश्न आणि राजकीय जाणिवा अभिव्यक्त केल्या.

इ.स. १९२५ नंतर निर्माण झालेली मराठी कादंबरी संख्येच्या विपुलतेने व विषयाच्या विविधतेने नटलेली दिसते. या कालखंडात प्रामुख्याने फडके-खांडेकर यांच्या कादंबऱ्यांना अमाप लोकप्रियता मिळाली. ''कलेकरिता कला'' हा प्रवाह कादंबरीच्या क्षेत्रात रूजला आणि प्रा.ना.सी.फडके नीति-अनीती यांच्या पलिकडे कलेचा प्रांत आहे, असे ते मानत. तरूण-तरूणींचे प्रेम हे फडक्यांच्या कादंबरीचे विषय झालेले आहेत.

**ग्रामीण कादंबरीची वाटचाल-**

ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला इ.स. १९२५ पासून जाणीवपूर्वक प्रारंभ झालेला असला तरी त्याही पूर्वीपासून ग्रामीणत्वाच्या खुणा अव्वल इंग्रजी कालखंडात दिसतात. त्या दृष्टीने म.फुले, कृष्णराव भालेकर, धनुर्धारी, हरिभाऊ इत्यादींनी प्रारंभीच्या काळात आपल्या लेखणीने आविष्कार केला आहे.

अनेक विषयावर ग्रंथलेखन करणाऱ्या धनुर्धारी यांनी 'वाईकर भटजी' (इ.स. १८९८) ही पहिली ग्रामीण रूपांतरित कादंबरी लिहिली आणि तो अतिशय लोकप्रिय झाली. त्याचप्रमाणे 'पिराजी पाटील' (इ.स. १९०३) ही पहिली स्वतंत्र ग्रामीण कादंबरी त्यांनी लिहिली. परंतु ही स्वतंत्र ग्रामीण कादंबरी असूनही दुर्लक्षित झाली आहे.

इ.स. १९२५ पासून जाणीवपूर्वक ग्रामीण साहित्य निर्माण झाले. इ.स. १९२५ नंतरचा पहिला ग्रामीण कादंबरी लेखनाचा मान ना.वि.कुलकर्णी यांना जातो. 'कसे दिवस जातील' (इ.स. १९२५) 'शिपाई' (इ.स. १९२५) या कादंबऱ्यांच्या माध्यमातून जीवनानुभवाच्या वेगवेगळ्या वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला आहे.

इ.स. १९३९ च्या डिसेंबरमध्ये ग्रामीण कादंबरी प्रेरणाभिन्नतेतून आकारास आली. परंतु इ.स. १९४० नंतर मात्र "र.वा.दिघ्यांची 'पाणकळा' प्रसिद्ध झाली आणि मराठी कादंबरीत पहिल्यांदाच मराठी मातीचा गंध दरवळण्याचा अनुभव मराठी वाचकाला आला."[१६] दिघे यांच्या लेखनाची प्रेरणा घेऊन ग.ल.ठोकळ यांनी 'गावगुंड' ही कादंबरी लिहून लोकप्रियतेचा उच्चांक गाठला.

"पाणकळा" ते "बळी" असा सुमारे अकरा वर्षांचा काळ पाहिल्यानंतर मर्ढेकर यांची 'तांबडी माती' (इ.स. १९४३), ना.के.महाजन यांची 'किसान' (इ.स. १९४६), म.भा.भोसले यांची 'समरांगण' (इ.स. १९४१), आणि 'उघड्या जगात' (इ.स. १९४७), विभावरी शिरूरकर यांची 'बळी' (इ.स. १९५०) इत्यादींनी आपापल्या वकूबानुसार या काळातील ग्रामीण कादंबरीमध्ये मोलाची भर घातली.

इ.स. १९४५ नंतर ग्रामीण साहित्यात एक महत्त्वाची पिढी उदयाला आली. शंकर पाटील यांची 'टारफुला',व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी', रणजित देसाई यांची 'बारी' इत्यादींनी विषयाच्या व आशयाच्या दृष्टीने मराठी कादंबरीचे क्षेत्र व्यापक केले.

इ.स. १९६० नंतर समाजाच्या विविध थरातून आलेल्या नवशिक्षित लेखकांनी ग्रामीण साहित्याचे अग्रगण्य असलेले आनंद यादव यांची गोतावळा, रा.रं.बोराडे यांनी 'पाचोळा'इत्यादी कसदार पण अल्प लेखन केले आहे. यासारख्या अनेक कादंबऱ्यांना ग्रामीणतेबरोबरच प्रादेशिक कादंबरीची परिमाणे लागली सद्य:स्थितीत हे मान्य करावेच लागते की, प्रादेशिकतेच्या मोहक प्रचंड लाटेत आज तरी ग्रामीण कादंबरी समरूप झालेली आहे.

श्री.ना.पेंडसे, गो.नि.दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, रा.रं.बोराडे,उध्दव शेळके, हमीद दलवाई, आनंद यादव इत्यादी लेखकांनी महाराष्ट्राचे विविध भाग कादंबरीत आणले. कादंबरीच्या क्षेत्रातील विविधता व विपुलता सांगताना म.द.हातकणंगलेकर म्हणतात "स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी कादंबरीचे समग्र क्षेत्र नव्या अवकाशांनी गजबजून गेले आहे."

कादंबरी हा समाजवास्तवनिष्ठ असा साहित्य प्रकार आहे. मानवी मन, जीवन आणि त्याभोवतीचा समाज यांच्या प्रत्ययकारक चित्रणासाठीच खरी कादंबरी लिहिली जाते. आपल्या कादंबरीतून जे विश्व कादंबरीकार उभे करीत असतो त्याद्वारे त्याला आपली म्हणून विशिष्ट भूमिका स्पष्ट करावयाची असते.

एकंदरीत कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा आजवरचा इतिहास पहाता त्याची प्रकृती समाजाच्या वास्तवाशी निगडित अशीच राहिली आहे. कादंबरी वाङ्मयाचा विकास अखंडपणे सुरू आहे आणि त्यात नवनवीन विषयांची भर पडत आहे.

ग.त्र्यं.माडखोलकर हे महत्त्वाचे कादंबरीकार होत. 'मुक्तात्मा', 'मुखवटे' या कादंबऱ्या लिहून त्यांनी मराठीतील राजकीय कादंबरीकार म्हणून लौकिक मिळविला. या

कादंबऱ्यातून त्यांनी गांधीवाद विरोधी भूमिका घेतली असून हिंदुत्ववादाचा आणि सशस्त्र क्रांतीवादाचा पुरस्कार केला. तर त्यांच्या 'भंगलेले देऊळ', 'दुहेरी जीवन', व 'नवे संसार' इत्यादी कादंबऱ्यामधून आजच्या काळात भग्नावस्थेप्रत आलेल्या विवाह संस्थेचे वर्णन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. फडके, खांडेकर व माडखोलकर यांच्या लेखनाचा प्रभाव स्त्रियांच्या कादंबरीलेखनावरही आहे. कमलाबाई सोहोनी, इंदिराबाई सहस्त्रबुध्दे, शांताबाई नाशिककर, फिरोज, आनंदकर, कुमुदिनी रांगणेकर, प्रेमा कंटक, सरोजिनी बाबर इत्यादी स्त्रियांनी जे कादंबरी लेखन केले त्यामध्ये त्यांनी स्त्रीचे दु:ख चित्रित करण्याचा, स्त्री समोर उभ्या असलेल्या सामाजिक समस्यांची मांडणी करण्याचा स्त्रीला सोसाव्या लागणाऱ्या अन्यायाला, जुलमाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. इ.स. १९३० पर्यंतच्या स्त्रियांच्या कादंबरीलेखनाविषयी कुसुमावती देशपांडे म्हणतात ''जे स्त्रियांनाच बोचेल व जे पुरूष लेखकांना शोधून ही दिसणार नाही अशा अनुभूतीची एखादी स्पर्शछटा यात मोलाची ठरण्यासारखी आहे.''[१८] अशा प्रकारे स्त्रियांनी आपल्या कादंबरीलेखनातून स्त्रियांच्या मुलभूत समस्यांचा वेध घेतलेला आहे.

''इ.स. १९७५ च्या सुमारास ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. ग्रामीण समाजाची सुख दु:खे व्यक्त झाली पाहिजेत या हेतूने आनंद यादव, रा.रं.बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले, चंद्रकुमार नलगे यांनी या चळवळीला वैचारिक पाठबळ दिले. संमेलन, मेळावे व परिसंवादातून चळवळीची भूमिका मांडली जाऊ लागली. यामुळे ग्रामीण नवलेखकांना नवे आत्मभान आले, कोणासाठी  लिहायचे, काय लिहायचे हे प्रश्न स्पष्ट झाले. शोषणमुक्त समाजनिर्मितीच्या ध्येयात आपणही सामिल झाले पाहिजे. या जाणिवेतून तो लेखन प्रवृत्त झाला. त्याच्या या साहित्याला आधुनिक ग्रामीण साहित्य म्हटले जाऊ लागले.''

थोडक्यात इ.स. १९७५ नंतरची ग्रामीण कादंबरी एखाद्या फुलासारखी फुलून आली आणि या फुलांचा एक गुच्छ तयार झाला असे म्हटले तरी वावगे ठरू नये. या काळातील ग्रामीण कादंबरीने ग्रामीण परिसरात वाढलेल्या अपप्रवृत्ती, समाजव्यवस्था या साऱ्यांचा

डोळसपणे विचार करून नेमक्या शब्दांत वर्णन केल्यामुळे बदलत्या ग्रामीण जीवनाचे प्रत्यंतर घडविणारी कादंबरी म्हणून तिचे महत्त्व विशेष असे आहे. याशिवाय ग्रामीण कादंबरीने ग्रामीण वास्तवाशी एक जवळीकतेचे नाते निर्माण केले आहे असे म्हणावे लागेल.

आजच्या ग्रामीण साहित्य अभ्यासकांनी ग्रामीण कादंबरीचा सखोल अभ्यास करून तिचे वेगळेपण दाखविले आहे आणि एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. यासंदर्भात डॉ. रविंद्र ठाकूर लिहितात ''मराठी ग्रामीण कादंबरीने 'कादंबरी' या साहित्यप्रकाराच्या प्रकृतीचे भान अगदी सुरूवातीपासून बाळगण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य ही एक सामाजिक घटना आहे. कादंबरी हा समकालीन, समाजवास्तव चित्रित करणारा एक वाङ्मयीन दस्तऐवज आहे याचे भान ग्रामीण कादंबरीने दाखविले आहे.''[२०]

आनंद पाटील 'कागूद आणि सावली' (१९८६), विश्वास पाटील 'झाडाझडती', पुरूषोत्तम बोरकर 'मेन इन इंडिया' (१९८७), अशोक व्हटकर 'बगाड' (१९८४), नागनाथ कोतापल्ले 'उलट चालिला प्रवाहो' (१९८५), वासुदेव मुलाटे 'विषवृक्षाच्या मुळ्या' (१९८९), ह.मो.मराठे 'देवाची घंटा' (१९८७), रविंद्र शोभणे 'प्रवाह' (१९८३), मोहन पाटील 'लिगाड आणि खांदेपालट' (१९९०) इत्यादी कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील ताणतणाव स्थित्यंतरे प्रकट केली आहेत.

याशिवाय आणखी काही कादंबरीकारांनी ग्रामीण जीवनाचे विविधांगी दर्शन घडविले, बाबा भांड 'तरंगा' (१९७८), नामदेव ढसाळ 'हाडकी हाडवळा', विजय शिरसाट 'काळगर्भ', रंगनाथ पठारे 'ताम्रपट', रंगराव पाटील 'दंश' (१९८७), व.बा.बोधे 'जंगल', सुरेश शिंगटे 'कालवा' इत्यादी कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनातील वास्तवाचे यथार्थपणे दर्शन घडविले आहे.

ग्रामीण कादंबरीला आकार देण्याचे मोलाचे कार्य वरिल सर्व लेखकांनी केले.

आजची ग्रामीण कादंबरी केवळ ग्रामीण जीवन चित्रण रेखाटत नाही तर जीवनात येणाऱ्या समस्या दु:ख या मागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहे. असाच प्रयत्न आजचे उल्लेखनीय कामगिरी करणारे लेखक सतीश जाधव करत आहेत. एकविसाव्या शतकात एक सकस ग्रामीण लेखक म्हणून ग्रामीण साहित्याच्या आकाशात चमकायला लागले आहेत असे म्हणणे योग्यच ठरेल.

आधुनिक काळाचा रेटा, औद्योगिकरण, भांडवलशाही, मिश्र अर्थव्यवस्था या साऱ्यांमुळे ग्रामीण भागात असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांना सामोरे जाऊन आजचा ग्रामीण लेखक वास्तवरूप मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या वास्तवाशी त्या समस्यांशी त्याचे काहीतरी नाते असते, तळमळ असते त्यामुळे आजची कादंबरी ही सर्वस्पर्शी झाली आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाचे वास्तवरूप टिपण्याचा प्रयत्न या काळातील अनेक कादंबरीकारांनी केला आहे असे म्हणावे लागेल. या काळात अनेक लेखक निर्माण झाले. त्यापैकीच महत्त्वाचे ग्रामीण लेखक सतीश जाधव यांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

सतीश जाधव यांनी आपले अनुभव प्रामाणिकपणे ग्रामीण कथा-कादंबऱ्यातून मांडले आहेत. त्यांनी ग्रामीण जीवनाविषयक निष्ठा जोपासून ग्रामीण जीवनातील वास्तवाचे चित्रण केलेले आहे. त्यांच्या साहित्याविषयीचा ऊहापोह आपण करणार आहोत. बदलते खेडे आणि तेथील जीवनपद्धती ग्रामीण जीवनातील भेडसवणारे प्रश्न, मनाची होणारी घुसमट, वेदना, त्याचबरोबर विद्रोह याचे चित्रण त्यांनी कथा-कादंबऱ्यातून साकार केले आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाशी ते खंबीरपणे सामोरे गेले आहेत. त्यांनी पाहिलेले, अनुभवलेले दु:ख, दारिद्र्य यांचा आलेखच कादंबऱ्यातून रेखाटला आहे.

पुढील प्रकरणात आपण लेखक सतीश जाधव यांचे वाङ्मयीन कार्य अभ्यासणार आहोत.

# संदर्भसूची


१) ठाकूर (डॉ) रविंद्र - कादंबरीकार र.वा.दिघे, पुणे, १९९५ पृ. २.३.

२) बापट प्र.वा., गोडबोले ना.वा. - मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) व्हीनस प्रकाशन, पुणे ४११०३०, तिसरी आवृत्ती, १७७३, सु.आ. पृ. ५.

३) उनि, पृ. १०.

४) बांदिवडेकर (डॉ) चंद्रकांत - मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०, प्रथम आवृत्ती १९८९, पृ. ७.

५) बापट प्र.वा., गोडबोले ना.वा. - मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास), उनि, पृ. ३६.

६) तत्रैव, पृ. ३७.

७) तत्रैव, पृ. ३७.

८) संत (प्रा) जान्हवी - मोघे प्रकाशन, कोल्हापूर - २, प्रथम आवृत्ती १९७१ पृ. ९

९) तत्रैव पृ. १०.

१०) तत्रैव पृ. १३.

११) तत्रैव पृ. १४.

१२) कुलकर्णी विठ्ठल हरी - अर्वाचीन मराठी साहित्य, (१८७५ - १९३५) पृ. ७२.

१३) गाडगीळ गंगाधर - साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, आवृत्ती पहिली, १९६२, पृ.क्र.२०७.

१४) प्रिस्टले जे.बी. - केतकरी कादंबरी (दुर्गा भागवत), मौज प्रकाशन गृह मुंबई, आवृत्ती पहिली, १९६७, पृ.क्र. ७.

१५) सोमण (डॉ) अंजली - साहित्य आणि सामाजिक संदर्भ, पुणे १९८९, पृ. ७६.

१६) ठाकूर (डॉ) रविंद्र - मराठी ग्रामीण कादंबरी १९८० ते १९९०, मेहता पब्लिशिंग हाऊस, प्रथम आवृत्ती, १९९३, पृ. १७.

१७) खोले विकास (संपा) - गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, २००२, पृ. ६.

१८) देशपांडे कुसुमावती - मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी साहित्य संघ मुंबई, १९७५, पृ. १४०.

१९) ठाकूर (डॉ) रविंद्र - मराठी ग्रामीण कादंबरी १९७५ - २०००, उनि, पृ. १६६-१६७

२०) तत्रैव पृ. ८